सी.एन.आर.क्र. एम.एच.एस.आय ०९–०००११५– २०२०

नियमित दिवाणी दावा क्र. १७/२०२०

## निशाणी क्र.५८ वरील आदेश.

प्रस्तुतचा अर्ज हा वादी यांनी न्यायालयीन आयोग म्हणून उपअधिक्षक, भुमि अभिलेख, देवगड यांची नेमणुक करण्यात यावी यासाठी दाखल केला आहे.

०२. प्रतिवादीचे असे कथन की, सदरील दावा वादीने हक्क स्थापनेसाठी दाखल केला आहे. दावा 'अ' मिळकतीत जाण्यासाठी असलेली वाट तसेच हवा व उजेड येण्याचा हक्क इत्यादी साठी हक्कस्थापन करून मागीतला आहे. प्रतिवादींनी बेकायदेशीररित्या इमल्याचे बांधकाम केले आहे. त्यास दावा दाखल झाल्यावर पडेल ग्रामपंचायत घर नं. १२०४ असा देण्यात आला आहे. सदरचे बांधकाम महसुल तथा ग्रामपंचायत नियमांचे उल्लंघन करून बांधण्यात आलेले आहे. त्यामुळे वर नमूद केल्याप्रमाणे, वादीच्या हक्कास बाध येणार आहे. याकामी न्यायदानास मदत होण्यासाठी, वादीचा इमला व प्रतिवादींनी केलेले बांधकाम याबाबतची वस्तुस्थिती मे. न्यायालयाच्या नजरेस येणे आवश्यक आहे. सबब याकामी मे. उपअधिक्षक भुमिअभिलेख देवगड यांची न्यायालयीन आयोग म्हणून नेमणुक करण्यात येवून, त्यांना दोन्ही दावा मिळकतींची मोजणी करून दोन मिळकतींची वस्तुस्थिती, दोन इमारतींमधील अंतर, नवीन बांधकाम केलेल्या इमारतीच्या चारही बाजूने हद्दीपासुनचे अंतर, विजयदुर्ग- तरळे या महामार्गापासून प्रतिवादीनी केलेल्या बांधकामाचे अंतर, 'अ', व 'ब' मिळकतीतील रस्ते, गडगे इत्यादी, जी वस्तुस्थिती दिसून येणारी आहे ती नकाशासह अहवालत नमूद करून तसा अहवाल सादर करण्याची विनंती वादीने केली आहे. तसेच, वादी आवश्यक ते न्यायीक शुल्क जमा करण्यास तयार आहेत.

०३. वादीने या अर्जास नि.क्र.५९ येथे म्हणणे दिले आहे. वादीच्या म्हणण्यानुसार वादीचा अर्ज खोटा व खोडसाळ आहे. तसेच, दोन्ही पक्षामध्ये अतिक्रमण किंवा हद्दीबाबत कोणत्याही प्रकारचा वाद नाही, त्यामुळे कोर्ट कमिशनरची नेमणुक करणे आवश्यक नाही. वादीने दावा मिळकतीची वस्तुस्थिती शाबीत करावयाची आहे. कोर्ट

कमिशनरची नेमणुक पुरावा गोळा करण्यासाठी करता येणार नाही. वादीला त्याचा दावा कोर्ट कमिशनर यांच्याकडून सिध्द करुन घ्यायचा आहे व तो योग्य नाही. सबब, प्रतिवादीचा कोर्ट कमिशन अर्ज नामंजूर करण्यात यावा अशी विनंती वादीने केली आहे.

०४.　　　　दोन्ही बाजुंचे म्हणणे ऐकले. वादीने प्रस्तुतचा दावा हा हक्क स्थापनेसाठी व ताकीदीकरिता दाखल केला आहे. प्रतिवादीची कथने पाहता, वादीने खोटा अर्ज दाखल केला आहे. खरोखरच वादी म्हणतात त्याप्रमाणे प्रतिवादींनी ग्रामपंचायत घर क्र.१२०४ चे बेकायदेशीररित्या बांधकाम केले आहे किंवा नाही तसेच, दावा मिळकतीतील वस्तुस्थिती कोणत्या प्रकारची आहे ही बाब वादी व प्रतिवादींनी त्यांच्या पुराव्याआधारे याकामी शाबीत करणे गरजेचे आहे.

०५.　　　　सदर कामी कोर्ट कमिशनची नेमणुक हा पुरावा गोळा करण्यासाठी करता येत नाही. या दाव्याचे स्वरुप व प्रतिवादीची मागणी व कैफियत पाहता, प्रतिवादीने स्वत:ची कथने स्वत:च शाबीत करणे गरजेचे आहे. त्यासाठी त्याला कोर्ट कमिशन मागता येणार नाही. सबब, मी खालील आदेश पारीत करीत आहे.

– **आदेश** –

अर्ज नामंजूर करण्यात येतो.

NANDA BAPUSO GHATAGE　Digitally signed by NANDA BAPUSO GHATAGE Date: 2024.09.25 17:22:11 +0530

( श्रीमती एन.बी.घाटगे )
दिनांकः २३/०९/२०२४　　　　दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर देवगड